प्रकरण पाचवे

उपसंहार

प्रकरण पाचवे

उपसंहार

प्रकरण : पाचवे

उपसंहार

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा साहित्याचा विचार प्रस्तुत लघुप्रबंधात केलेला आहे. १९८० नंतरच्या कथालेखनामध्ये मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथालेखन महत्त्वाचे ठरते. त्यांच्या कथा साहित्यातून व्यापक अशी जीवनदृष्टी आणि चिंतनशीलता प्रकट होते. त्यामुळे त्यांची कथा वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये आणि वेगळेपण ध्यानात येण्यासाठी प्रस्तुत विषय निवडला. या अभ्यासातून मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथासाहित्याचे विशेष सारांश रूपाने या प्रकरणात नोंदविले आहेत.

पहिल्या प्रकरणात १९६० नंतरच्या मराठीतील कथा साहित्याचे स्वरूप-विवेचन केले आहे. प्रकरणाच्या आरंभी १९४५ पूर्वीच्या कथेची वाटचाल संक्षिप्त रूपात मांडली आहे. १९४५ नंतर निर्माण झालेली नवकथा व तिची स्वरूप-वैशिष्ट्ये संक्षेपाने नोंदविली आहेत. कथेच्या क्षेत्रात आतापर्यंत अलक्षित राहिलेल्या विषयांना नवकथेमध्ये स्थान मिळू लागले. बाह्य व्यक्तिदर्शनापेक्षा ती मानवी जीवनाचे चित्रण करु लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर माणसाची झालेली दयनीय अवस्था, त्याची आगतिकता, दुःख, वेदना याबरोबर त्याच्याठिकाणी असणारे वासना-विकार, मूल्यसंस्कार या सर्वांना नवकथेतून मांडले जाऊ लागले. नवकथेच्या काळात लिहिणारे प्रमुख लेखक गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले यांचे कथालेखन महत्त्वपूर्ण ठरते.

त्यानंतर एकूणच मराठी साहित्यामध्ये निर्माण झालेल्या साहित्यप्रवाहांचा विचार मांडला आहे. १९६० नंतरच्या मराठी कथेचा विचार करता तिचे विविधांगी स्वरूप लक्षात येते. १९६० नंतर मराठी कथा दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, नागर इ. साहित्यप्रवाहातून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आविष्कृत होऊ लागली. दलित अनुभवविश्वाचे प्रकटीकरण दलित साहित्यातून होऊ लागले. नवे ग्रामवास्तव ग्रामीण साहित्यातून प्रकट होऊ लागले. स्त्रीहुंकाराचा आविष्कार स्त्रियांच्या साहित्यातून होऊ लागला तर नागर परिसरातील व्यक्तिकेंद्री जीवन नागर साहित्यातून साकार होऊ लागले.

लघुप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील आशयसूत्रांचा अभ्यास केला आहे. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या *भूप* आणि *आर्त* या दोन्ही संग्रहातील कथेतील आशयसूत्रे व कथांचे वेगळेपण यांचा विचार या प्रकरणात मांडला आहे. कुटुंबातील नातेसंबंध आणि त्यामध्ये निर्माण झालेले गुंते, स्त्रियांची कुचंबणा हे त्यांच्या कथेचे मुख्य विषय आहेत. त्यांच्या कथेतून मुलगी, प्रेयसी, आई या वेगवेगळ्या टप्प्यावरील स्त्री येते. पुरुषप्रधान संस्कृतीत तिची होणारी घुसमट, कुचंबलेपण कथांमधून चित्रित होते. मुख्यत्वे त्यांच्या कथेतून नागरसंवेदनेचे विश्व प्रकटले आहे. तरुण पिढीचा परदेशी जाण्याकडे वाढत चाललेला कल आणि या सर्वामध्ये एकाकी पडलेला माणूस या नागर संवेदना त्यांच्या कथेतून येतात. तसेच मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्था तीमधील विविध प्रकारचे दर्शन ही कथा घडविते. कुटुंबसंस्थेच्या पडझडीस कारणीभूत ठरणारी अलीकडची ढासळती नीतिमूल्ये, दोन पिढ्यातील वाढत जाणाऱ्या अंतराचे चित्रण त्यांच्या कथा साहित्यातून येते. नव्या वास्तवाने उभे केलेले प्रश्न, मानवी वर्तन, घटना, माणसांच्या दुःखाला कशा कारणीभूत ठरतात याचे प्रभावी चित्रण येते. याचबरोबर वर्तमान समाजीवनातील बदलाचे चित्रण करणाऱ्या व बदलत्या नातेसंबंधांना रेखाटणाऱ्या कथाही येतात. नात्यामधील फोलपणा, निरुद्देश ठरलेले नातेसंबंध, सामाजिक परिस्थितीच्या पेचातून आलेले तुटलेपण या सर्वांना कथेतून रेखाटले आहे. स्त्री-पुरुष संबंधाचा सनातन झगडा, चाकोरीबाहेरचे नातेसंबंध व समलिंगी संबंध व त्यातील ताण-तणाव त्यांच्या कथेतून येतात. मराठी कथासाहित्याला अपरिचित असे अनुभवविश्वही त्यांच्या काही कथातून येते. मतिमंद लहान मुलांच्या भावविश्वाचे चित्रण

त्यांची कथा करते. अशा पद्धतीच्या विविध आशयांनी समृद्ध झालेल्या कथांचा सखोल अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

लघुप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथासाहित्यातील व्यक्तिचित्रणाचा विचार केला आहे. व्यक्तिचित्रणातील बाह्यवर्णनापेक्षा त्यांची कथा व्यक्तीच्या अंतरंगाला भिडताना दिसते. त्यांच्या कथेतील प्रधान सूत्रानुसारी व्यक्तिरेखांचे वर्गीकरण केले आहे. आई, मुलगी, प्रेयसी अशा वेगवेगळ्या भूमिकेतील स्त्री व्यक्तिरेखा त्या रेखाटतात. त्यांच्या कथातून येणारी स्त्री काहीशी शिक्षित असली तरी कोणत्या ना कोणत्या सामाजिक, धार्मिक व्यवस्थेच्या जोखडाखाली घुसमटलेली दिसते. पण त्याच्यातूनही सुटका करण्यासाठी तिची चाललेली धडपड विलक्षण आहे. या स्त्री व्यक्तिरेखांद्वारे स्त्रीची कोंडलेली अवस्था, विशिष्ट समाजसंस्कृतीत तिची होणारी घुसमट या जाणिवा त्या प्रकट करतात. त्यांच्या कथेतून पुरुष व्यक्तिरेखाही प्रभावीरित्या चित्रित झाल्या आहेत. यामध्ये वडील, पती, मुलगा, भाऊ, प्रियकर या व्यक्तिरेखा साकारतात. समाजातील पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेचे प्रतिनिधित्व या व्यक्तिरेखा करतात. तर काही वेळा हळवा, परिस्थितीपुढे शरणागत झालेला पुरुष दिसतो. तसेच विलक्षण जगण्याच्या उर्मीतून पुन्हा जन्म घेऊन जगू पाहणारी पुरुष व्यक्तिरेखाही दिसते.

तसेच कथामधून अन्य व्यक्तिरेखाही येतात. त्यांच्या कथेतून पौगंडावस्थेतील मतिमंद मुलांचे चित्रण येते. या मुलांच्या जगण्याची रीत आणि त्यांच्या शारीरधर्म अवस्थांतराची जाणीव या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून होते. बधीरतेचा शिक्का मारलेला असूनही त्यांचे संवेदनशील मनाचे दर्शन या मुलांच्या व्यक्तिरेखांतून होते. याशिवाय कलाक्षेत्राशी संबंधित विविध व्यक्तिरेखा त्यांनी साकार केल्या आहेत. या व्यक्तींचा जीवनानुभव व त्यांचा जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण या कथेमधून व्यक्त होतो. व्यक्ती म्हणून त्यांच्या असणाऱ्या वासना-कामना येतात. त्याचबरोबर एक कलावंत म्हणून त्यांचे सर्जक मन व व्यवहार यातील

ताणाचे ते चित्रण करतात. जीवनात येणाऱ्या बऱ्या-वाईटाचा अनुभव घेत, कधी लढत, कधी आधार घेत तर कधी तटस्थतेची भूमिका घेत जगणाऱ्या व्यक्तिरेखा येतात. या साऱ्या व्यक्तिरेखांच्या चित्रणातून त्यांचे मानसविश्व प्रकटते.

लघुप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथालेखनातील वाङ्मयीन रूपविशेषांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या कथेतील लेखनाचे अनुभवविश्व हे वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाचे अभिव्यक्ती विशेषही वैविध्यपूर्ण असे आहेत. नागर जीवनातील मध्यमवर्गीय लोकांचे जीवन त्यांच्या कथेतून येते. याच लोकांच्या जगण्याशी संबंधित असलेली भाषाशैली वापरतात. नागरजीवनाशी संबंधित भाषिक विश्व त्यांच्या कथेतून प्रकटते. वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या, समाजात वावरणाऱ्या व्यक्ती व त्यांच्याशी निगडित असणाऱ्या हिंदी-इंग्रजी-नागर शब्दप्रयोगांचा वापर त्या कथेतून करतात. कथाशयाला, कथार्थाला पूरक-अनुरूप ठरणारी गद्यशैली त्यांनी उभी केली आहे. जीवनानुभवाचा काहीसा दीर्घ पल्ला साक्षात करण्यासाठी दीर्घकथेचा आकृतिबंध त्यांच्या कथेने धारण केला आहे. कथेतून येणारा अनुभवघटक हा प्रसरणशील असल्याने त्यांच्या कथा 'दीर्घ' ठरतात. कथेतून येणारे संवाद, वर्णने आणि निवेदनपद्धती ही थेट आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहे. संवादाद्वारे त्या त्या व्यक्तीचे संज्ञापन अन्वर्थक रीतीने प्रकट करतात. विशिष्ट लिंगभाव, वयोमान व व्यवसायानुसार भिन्नता असणाऱ्या व्यक्ती या संभाषणातून उभ्या करतात. त्यांच्या कथातून प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी असे निवेदन येते. अशाप्रकारच्या निवेदनाने लेखिका विविध घटनाप्रसंगांना एकत्र बांधून त्याला एकसूत्रता प्राप्त करुन देतात. दीर्घ अनुभवविश्वाला पेलणारे निवेदनतंत्र त्यांच्या कथेतून येते. तसेच लेखिका काही वर्णने प्रतिकांच्या रूपातून करतात. काही वर्णने वस्तू, शिल्प, परिस्थिती, परिसर, व्यक्ती यांची येतात. तर काही वर्णने अर्थाच्या अनेक शक्यता निर्माण करणारी येतात. जीवनानुभवाच्या प्रत्ययकारी मांडणीसाठी त्या त्या अनुभवक्षेत्राशी संबंधित भाषिक क्षेत्रे त्या

उभ्या करतात. उदा. कलाक्षेत्राशी संबंधित विश्व विशिष्ट शब्दांच्या साहाय्याने उभ्या करतात. तसेच त्यांच्या कथेतून येणारा शब्दसंग्रह हा अनुभवघटकाला परिणामकारकता प्राप्त करुन देतो.

एकंदरीतच मोनिका गजेंद्रगडकर यांची कथा ही ऐंशीनंतरची मराठीतील महत्त्वाची कथा आहे. अनुभवांची व अभिव्यक्तीचे वैविध्य तीमध्ये आहे. त्यांच्या कथेचा अवकाश हा महानगरीय अनुभवविश्वाचा आहे. महानगरातील शिक्षित मध्यमवर्गीय जीवनाचे, संवेदनाचे त्या कथन करतात. नव्या अवकाशात उभे राहिलेले व्यक्तींचे, कुटुंबाचे प्रश्न-ताण ही कथा चित्रित करते. स्त्रीविशिष्ट अनुभवाचे परिमाण तीस आहे. नागर कुटुंबातील संवेदनविश्व तिने व्यापले आहे. व्यक्तिकेंद्रितता, व्यक्ती स्वभावाच्या विशिष्ट वर्तनातून निर्माण झालेले ताण, एकाकीपण, दोन पिढ्यामधला अंतराय, अवकाश विस्तारित झाल्यामुळे येणारे परकेपण, खुंटलेपण, जातीय ताण, गुंते असे विविध प्रश्न ती उभे करते. महानगराच्या बाह्य पर्यावरणाचे व्यक्तिमनावर होणारे संस्कारठसे ती उभी करते. विशिष्ट संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबणा तसेच नव्या काळाने तिच्यात आलेले आत्मभान ती उभी करते. मराठी कथात्म साहित्यास अलक्षित वाटावे असे अनुभवविश्व ती मांडते. मतिमंद मुलांच्या जीवित कथा ही कथा रेखाटते. वाङ्मयीन रूपाच्या दृष्टीनेही ही कथा वेगळी ठरली आहे. आशयानुभवाची दीर्घ अशी कक्षा साकार करण्यासाठी कथेचा दीर्घ आकृतिबंध त्यांनी स्वीकारला आहे. संवाद, संभाषिते, निवेदन, व्यक्तीचित्रणे, शब्दनिधी या दृष्टीने त्यांच्या कथेचे रूप वैशिष्ट्यपूर्ण ठरते. म्हणूनच मोनिका गजेंद्रगडकर यांची कथा ऐंशीनंतरची महत्त्वाची कथा ठरते.